तुमच्या कुटुंबात कोणत्या भाषा बोलल्या जातात? तुम्ही त्या भाषांसोबत वैयक्तिकरित्या कसे जोडले जाता किंवा त्यांचा वापर कसा करता?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या मनात तुमची प्रतिमा काय आहे?तुमचे कपडे, देहबोली, तुम्हाला आवडणारी पुस्तके आणि तुम्ही करत असलेल्या उपक्रम मधून तुम्ही कोण आहात हे कसे दाखवता?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

इतर तुमच्याबद्दल काय गृहीत धरुन चालतात असे तुम्हाला वाटते? जेव्हा लोक तुमच्याबद्दल असे गृहीत धरतात तेव्हा तुम्हाला कसे वाटते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

लहानपणी तुम्हाला खायला आवडणारा पदार्थ कोणता?

उपक्रम कल्पना: कुटुंबासोबत एखादा पदार्थ बनवा. त्यानंतर तुम्ही वापरलेले साहित्य आणि कृती लिहून ठेवा जेणेकरून तुमचा आवडता पदार्थ इतरांनाही बनवून बघता येईल

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्ही कधी तुमच्या गावाला भेट दिली आहे का जिथे तुमच्या मागील पिढ्या राहिल्या होत्या? जर तुम्ही भेट दिली असेल, तर तुमची भेट कशी होती? जर तुम्ही भेट दिली नसेल, तर तुम्हाला भेट देण्याची संधी मिळाली तर तुम्ही काय कराल?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

जर तुम्हाला एखाद्या पूर्वजाशी,व्यक्तीशी जी आता हया जगात नाही बोलता आले, तर तुम्ही त्यांना काय सांगू किंवा विचारू इच्छिता? जर तुम्हाला एखाद्या वंशजाशी, पुढच्या पिढीतल्या कुटुंबातील सदस्याशी बोलता आले, तर तुम्ही त्यांना काय सांगू किंवा विचारू इच्छिता?

उपक्रम कल्पना: पूर्वज किंवा वंशजांसाठी एक पत्र लिहा किंवा कार्ड बनवा. तुमचे विचार, भावना आणि त्यांच्यासाठी तुमचे कोणतेही प्रश्न असल्यास ते विचारा.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमचे कुटुंब कुठून आले? त्या ठिकाणाबद्दल काही कुटुंबाचा इतिहास काय आहे?

उपक्रम कल्पना: तुमचे कुटुंब कुठून आहे हे शोधण्यासाठी नकाशा, ग्लोब किंवा गुगल मॅप्स बघा.तिथे जीवन कसे असेल याची कल्पना करा.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्हाला आवडणारी कौटुंबिक परंपरा कोणती आहे? किंवा तुम्हाला कोणती नवीन परंपरा सुरु करायला आवडेल का?

उपक्रम कल्पना: कुटुंबाला एकत्र करून एक खास परंपरा साजरी करा आणि एकत्र आठवणी निर्माण करा.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमचा एखादा आवडता फोटो आहे का? जर तुम्हाला एखाद्या गोष्टीचा फोटो काढायची संधी मिळाली, तर तुम्ही त्या फोटोमध्ये काय टिपायला आवडेल ?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्ही लहान असताना जिथे राहत होता त्या जागेचे वर्णन करा - तुमचे घर, परिसर आणि आजूबाजूचे काहीही. तुम्ही जिथे वाढलात त्याबद्दल विचार करता तेव्हा तुम्हाला सर्वात जास्त काय आठवते?

उपक्रम कल्पना: तुम्ही लहान असताना जिथे राहत होता त्या जागेचे चित्र काढा. ते चित्र तुमचे घर, परिसर किंवा तुमची एखादी छान आठवण ह्याबद्दलही असू शकेल.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या घरातली एखादी खास वस्तू तुम्ही मला दाखवू शकता का जी तुम्हाला खूप आनंद देते.
तुमची ही सगळ्यात खास/आवडती वस्तू का आहे?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

असा काही वास, आवाज, चव किंवा दृश्य आहे का ज्यामुळे तुम्हाला भूतकाळातील आठवणी आठवतात? ते काय आहे आणि ते तुम्हाला त्या काळाची आठवण का करून देते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्यासाठी खरोखर खास असलेले एखादे आवडते पुस्तक, कविता किंवा गोष्ट आहे का? ते तुमच्यासाठी इतके अर्थपूर्ण का आहे?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या बद्दलची कोणती गोष्ट इतरांना कळावी किंवा माहीत असावी असे तुम्हाला वाटते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या कुटुंबाच्या इतिहासाबद्दल किती वर्ष जुनी माहिती तुमच्या कडे उपलब्ध आहे?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

जेव्हा तुम्ही तुमच्या कुटुंबाबद्दल विचार करता तेव्हा तुम्हाला कोणत्या गोष्टीबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता असते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या कुटुंबात अशा काही कथा, दंतकथा किंवा लोककथा आहेत का ज्या परंपरेने चालत आल्या आहेत?

उपक्रम कल्पना: तुमच्या कुटुंबाच्या इतिहासातून एक कथा किंवा आख्यायिका निवडा, नंतर ती कुटुंबातील सदस्यासह एकत्र वाचा, किंवा तुमच्या खेळण्यातल्या प्राण्याला किंवा पाळीव प्राण्याला ती मोठ्याने वाचा.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्हाला कधी खूप एकटेपणा जाणवला आहे का ? जेव्हा खूप एकाकी वाटते तेव्हा काय केले की बरे वाटते किंवा कोणाशी भेटून ,बोलून बरे वाटते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्ही तुमच्या समुदायातील कोणत्याही उपक्रमांमध्ये किंवा क्लबमध्ये सामील झाला आहात का? त्यांचा भाग असण्याचा अनुभव कसा होता?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुमच्या समुदायाचा भाग असल्याचा तुम्हाला अभिमान का वाटतो?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

बालपणीचा अनुभव/ आयुष्य कसे होते , काही आठवणी सांगू शकणार का?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्ही कधी इतिहासाच्या पुस्तकात उल्लेख असलेली एखादी घटना पाहिली आहे किंवा त्यात सहभागी झाला आहात का? त्या घटनेचा तुमच्यावर किंवा तुमच्या कुटुंबावर वैयक्तिकरित्या कसा परिणाम झाला?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

जर तुम्हाला भविष्यात उघडण्यासाठी एक खास बॉक्स/डब्बा, टाइम कॅप्सूल बनवता आला, जेणेकरून भविष्यातील लोकांना आज आपण कसे जगतो हे शिकण्यास मदत होईल, तर तुम्ही त्यात काय ठेवाल?

उपक्रम कल्पना: तुमच्या सध्याच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खास वस्तू गोळा करा आणि त्या एका डब्यात ठेवा. डबा सुरक्षित ठिकाणी पुरून टाका किंवा लपवून ठेवा जेणेकरून भविष्यात परिस्थिती कशी बदलली आहे ते पाहण्यासाठी ते उघडले जाईल.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

दुसऱ्या भाषेतील तुमचा आवडता वाक्य किंवा शब्द कोणता आहे?

उपक्रम कल्पना: तुमच्या आवडत्या वाक्यांश किंवा शब्दाचा समावेश असलेली कलाकृती तयार करा. वाक्यांश किंवा शब्द उठून दिसण्यासाठी रंग आणि आकार वापरा.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

तुम्हाला स्वत:बद्दल कोणत्या गोष्टी आवडतात?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

लहानपणी तुम्हाला कोणता पदार्थ आवडत नव्हता? तो पदार्थ खाल्ल्यावर तुम्हाला तुम्हाला कसे वाटायचे? तुम्हाला का आवडत नसे?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

आजी किंवा आजोबांनी तुम्हाला कधी त्यांच्या लहानपणी किंवा लहानपणी कसे होते याबद्दलच्या गोष्टी सांगितल्या आहेत का? आजी आणि आजोबांची भेट कशी झाली?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

प्रेमाचा तुमच्यासाठी काय अर्थ आहे? तुम्ही तुमचे प्रेम कसे व्यक्त करता? जेव्हा कोणी तुम्हाला प्रेमानी वागवते तेव्हा तुम्हाला कसे वाटते?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

## आपल्या समुदायात किंवा परिसरात अशी कोणती गोष्ट आहे ज्याबद्दल तुम्हाला अधिक जाणून घ्यायची उत्सुकता आहे?

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

## स्टोरी टॉक कार्ड्स बद्दल माहिती

एशियन/पॅसिफिक अमेरिकन लायब्रेरियन असोसिएशन (एपीएएलए) द्वारे तयार केलेली टॉक स्टोरी प्रॉम्प्ट कार्ड, लोकांना त्यांची संस्कृती, कौटुंबिक इतिहास इ. बद्दल अर्थपूर्ण संभाषण करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी तयार केली आहेत . कौटुंबिक साक्षरता, पिढ्यांमधील संवाद/उपक्रम , सांस्कृतिक साक्षरता आणि ओळख या टॉक स्टोरी मूल्यांवर रेखाटलेली आहेत. .

प्रॉम्प्ट कार्ड्सचे मराठीत भाषांतर केल्याबद्दल एशियन पॅसिफिक अमेरिकन लायब्रेरियन असोसिएशनच्या (APALA) लिटरसी फोकस कमिटी तर्फे सौ. मृणाल रानडे यांचे मन:पुर्वक आभार .

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

## कार्ड कसे वापरावे

- आम्ही तुम्हाला कुटुंब, मित्र आणि तुमच्या आयुष्यातील इतर कोणत्याही व्यक्तीसोबत कार्डे बनवण्यास प्रोत्साहित करतो.
- कार्डे एकत्र वाचा आणि प्रश्नांवर अनौपचारिकपणे गप्पा मारा.
- तुम्ही कोणताही प्रश्न तुमच्यासाठी आणि तुमच्या कुटुंबासाठी वैयक्तिकृत करू शकता.
- तुम्ही आणि तुमचे कुटुंब. उदाहरणार्थ, जर तुमचे कुटुंब "आजोबा" आणि "आजी" साठी "लोलो" आणि "लोला" म्हणत असेल, तर आम्ही तुम्हाला प्रेमाच्या या संज्ञा वापरण्यास प्रोत्साहित करतो. हा सांस्कृतिक आणि कौटुंबिक साक्षरतेचा एक भाग आहे!

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association

## कार्ड कसे वापरावे

- यातील काही संभाषणे भावनिक किंवा कठीण वाटणे शक्य आहे
- यातील काही संभाषणांचे उत्तर "मला माहित नाही" असे असेल, आणि ते आक्षेपार्ह नाही
- काही प्रश्न वगळणे स्वीकार्य आहे.
- प्रश्नांची उत्तरे मोकळ्या मनाने द्या.
- काही कार्ड मधे या विषयांशी संवाद साधण्यासाठी सुचवलेल्या क्रियाकलाप/उपक्रम कल्पनांचा समावेश आहे.

Talk Story Prompt Cards created by the
Asian/Pacific American Librarians Association